# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price ₹ 3/-

# संवाद

|| स्वयमेव मृगेंद्रता ||

***मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।***
***सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।***

**Vol.- 6** **Issue 3** **सप्टेंबर - २०१३** **September 2013**


## संपादकीय

प्रिय सभासदमित्रांनो,

महाराष्ट्रातील एका कोपऱ्यातील जिल्ह्याचे ठिकाण धुळे. अशातच ह्या जिल्ह्याचे विभाजन होऊन नंदूरबार हा आदिवासी बहुल जिल्हा अस्तित्वात आलेला आहे. उत्तरेला सातपुडा, गुजराथ व मध्य प्रदेशाला लागून असलेला. तापी या नदीने सुपिक संपन्न झालेला. जिल्ह्यातील मुख्य पिक कापूस, नंतर ज्वारी, बाजरी, भुईमूग, कडधान्ये इ. मुंबई-आग्रा व नागपूर-सुरत या दोन महामार्गावरील एक प्रमुख शहर.

येथे दि. २७ ऑग. २०१३ ला आपल्या संघटनेची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली.

धुळे हे शहर एका बाजूला व मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर गोवा, नांदेड, लातूर या शहरांपासून खूप लांब अंतरावर असल्याने किती सभासद सभेला उपस्थित राहू शकतील या बाबतीत आयोजकांना सुरुवातीला काही अंदाज बांधता येईना, पण अपेक्षेपेक्षा जास्त संख्येने सभासदांनी या सभेला हजेरी लावली. ही सभा म्हणजे सभासदांच्या गाठी-भेटींचा एक आनंद सोहळाच असतो.

प्रामुख्याने धुळे, नंदूरबार, जळगाव, नाशिक व औरंगाबाद येथील सभासद बहु संख्येने उपस्थित होते. त्या खालोखाल पुणे, विदर्भ, कोल्हापूर, मुंबई येथून खाजगी जीप, बसेसने आलेल्या सभासदांमुळे आणि मुंबईहून आलेले संघटनेचे पदाधिकारी यामुळे ही सभा खूपच आनंदात व उत्साहात पार पडली.

आदल्या दिवशी म्हणजे २६ ऑग. २०१३ रोजीच बाहेर गावचे सभासद कार्यालयात यायला सुरुवात झाली. धुळे युनिटचे सदस्य येणाऱ्या पाहुण्यांच्या स्वागताला सिद्ध होते. सायंकाळी सर्वांच्या भोजनाची, रात्रीच्या मुक्कामाची व्यवस्था केलेली होती. ज्यांना हॉटेल रुममध्ये राहायचे होते त्यांचे रुम बुकींग अगोदरपासूनच केलेले होते. कार्यकर्ते योग्य ती मदत उपलब्ध करून देत होते. भोजनानंतर सभासदांसाठी रात्री ८ ते १० वाजेपर्यंत दोन तासांचा हिंदी-मराठी गीतांचा कार्यक्रम स्थानिक कलावंतांनी सादर केला. आपल्या काही सभासदांनी त्यात आपलाही थोडा सहभाग नोंदविला. त्यामुळे दिवस भर लांब प्रवास करून थकलेल्या/दमलेल्या सभासदांचा थकवा निघून गेला.

दुसरा दिवस महत्त्वाचा होता. सकाळी ९ वाजेपासूनच सभासदांचे कार्यालयात आगमन सुरू झाले. गरम गरम चहा, कॉफी व नाष्ट्यासोबत गाठीभेटी सुरू झाल्या. अनेक सभासद बऱ्याच कालावधीनंतर एकमेकांना भेटत असल्याने हाल-हवाल, प्रकृति विषयी विचारपूस, मुला-बाळांच्या चौकशा, गळाभेट होत होती. सभासद एकमेकांना भेटून आनंदीत होत होते. न येऊ शकलेल्या सभासदांची आपुलकीने चौकशी करीत होते.

१०।। वाजता कार्यक्रम पत्रिकेनुसार (Agenda) सभेचे कामकाज नियमानुसार शिस्तबद्धपणे सुरू झाले. या संपूर्ण सभेच्या कामकाजाचे इतिवृत्त (Minutes) यथावकाश 'संवाद' मधून सभासदांच्या माहितीसाठी व संघटनेच्या रेकॉर्डसाठी प्रसिद्ध होईलच.

धुळे येथील युनिटचे सदस्य व औरंगाबाद विभागाचे पदाधिकारी यांनी संपूर्ण सभेचे शिवधनुष्य यशस्वीपणे पेलले. विशेषत: औरंगाबाद विभागाचे अध्यक्ष व आपल्या संघटनेचे उपाध्यक्ष श्री. साहेबराव देसाई व त्यांना साथ देणाऱ्या सर्व धुळे युनिटचे सभासद यांनी घेतलेले कष्ट यामुळे ही सभा यशस्वीपणे पार पडली.

संपूर्ण सभेला एक मानवी स्पर्श होता. आपुलकी व आस्था होती. कार्यकर्त्यांच्या कामाचा सत्कार व सन्मान होता. पुढील बराच काळ धुळे येथील सभेच्या स्मृती मनात रेंगाळत राहतील याबद्दल शंका नाही!

- **वसंत** धुपकर, भ्रमणध्वनी -०२०-२०२५५४०८

*SPECIAL FESTIVAL OFFER,*

**FOR ALL YOUR INTERNATIONAL COURIER NEEDS**

***Universal Courier***

*We bring the universe at your doorstep*

*SINCE 1992*

*IATA CERTIFIED*

***An Organization run by SBI pensioners***

***Mr. J. N. Sethia & Mr. P. W. Kamerkar's next generation***

**Offering wide range of services for worldwide such as Express Courier, Airfreight Door to Door as well as Airport to Airport, Import/ Export custom clearance & free pick-ups from anywhere in Mumbai. Expertise in dealing with Foodstuff & personal effect shipments for worldwide.**

*Specialize for: UK, Dubai, USA, CANADA, and AUSTRALIA & AFRICA.*

***Contact: Mr.Biren Sethia - 9820338233, Mr.Mahesh Kamerkar - 9820316152, Pushpendra Tiwari -9870198118/9321026630 & Kajal - 8879140670***

**Landline: 022 - 26821072/74**

E-mail: sales@ucglobal.com & mahesh.k@ucglobal.com

Website: www.ucglobal.com



## ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे संक्षिप्त वृत्त

असोसिएशनची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२७ ऑगस्ट २०१३ रोजी धुळे येथील बाळकृष्ण मंगल कार्यालय येथे अत्यंत उत्साहात संपन्न झाली. सभेस अंदाजे ८५० पेन्शनर सभासद/सह-सभासद व फॅमिली पेन्शनर सभासद हजर होते. सभास्थानी, असोसिएशनचे अध्यक्ष श्री.गोखले व इतर पदाधिकारी आणि बँकेच्या रीजनल बिझिनेस ऑफिसचे उप-महाप्रबंधक श्री.मनोज नागेसाहेब, तसेच श्री.प्रदीप ठाकरेसाहेब, उमप्र (पीपीजी डिपा. मुंबई) इत्यादी पाहुण्यांचे आगमन झाल्यावर धुळे युनिटतर्फे प्रत्येकाचे शाल व पुष्पगुच्छ देऊन मोठ्या दिमाखात स्वागत करण्यात आले.

औरंगाबाद झोनल सब्-सेंटरचे अध्यक्ष श्री.साहेबराव देसाई यांनी 'आबासाहेब काशिनाथ लोखंडे' सभागृहात सर्वांचे हार्दिक स्वागत करून आपल्या प्रास्ताविक भाषणात धुळे परिसरात अनेक क्षेत्रांत सर्वोत्तम कार्य केलेल्या पूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लता मंगेशकर, विनोबा भावे, साने गुरूजी, महात्मा गांधी इत्यादी महान प्रभृतींच्या महान कार्याची आठवण करून देऊन, ही वार्षिक सभा आयोजित करण्याची संधी केंद्रीय कार्यकारिणीने धुळे युनिटला दिली याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यानंतर मान्यवरांचे हस्ते दीप-प्रज्वलन करण्यात आले व छत्रपती शिवराय व पेन्शनर्स असो.चे संस्थापक कै.ल.ना.पाबळकर यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले.

सेक्रेटरी श्री.लळिंगकर यांनी कार्यक्रम पत्रिकेनुसार सभेस सुरूवात करून या अधिवेशनाला शुभेच्छा पाठविणाऱ्यांचा उल्लेख करून त्यांना धन्यवाद दिले. नंतर गतवर्षात दिवंगत झालेल्या सभासदांना, तसेच उत्तराखंड दुर्घटनेत मृत पावलेल्या सर्व ज्ञात व अज्ञात देशबांधवांचे स्मरण करून सर्वांना श्रद्धांजली वाहण्याचे आवाहन केले. सर्व उपस्थितांनी दोन मिनिटे उभे राहून मूक श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर धुळे शहरामधील ज्येष्ठ नागरिक संघांच्या अध्यक्षांचे आपल्या असो.चे अध्यक्ष श्री.गोखलेसाहेब यांचे हस्ते शाल-श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन हार्दिक सत्कार करण्यात आले. तसेच कै.काशिनाथ लोखंडे यांच्या पत्नि श्रीमती शकुंतलाबाई लोखंडे व त्यांचे चिरंजीव यांचाही शाल/श्रीफळ देऊन हार्दिक सत्कार करण्यात आला. खानदेश विभागाच्या फेस्कॉमचे अध्यक्ष श्री.प्रभाकर पाटोळे यांनी ज्येष्ठ नागरिक संघांच्यावतीने सत्काराबद्दल आभारप्रदर्शन केले.

त्यानंतर असोसिएशनच्या मागील वर्षी दि.१९ जुलै २०१२ रोजी पुणे येथे झालेल्या वार्षिक सभेचा वृत्तांत, जो 'संवाद' च्या सप्टेंबर २०१२ च्या अंकात छापला आहे, सभेपुढे मंजुरीसाठी ठेवला. त्यास सर्वांनी एकमताने मंजुरी दिली.

त्यानंतर नेहमीच्या प्रथेप्रमाणे २७ ऑगस्ट रोजी ज्यांचा वाढदिवस असतो अशा सभासदांची नांवे श्री.अशोक पंडित यांनी वाचून दाखविली. त्यापैकी सभेत उपस्थित असलेले श्री.बी.एम.गुजराथी (धुळे) व श्री.आनंदमूर्ती जोशी (सांगली) यांचा पुष्पगुच्छ देऊन अध्यक्षांचे हस्ते सत्कार करण्यात आला. दरवर्षी संवाद मासिकातर्फे एक लेख स्पर्धा आयोजित केली जाते. त्यातील स्त्री व पुरूष विभागातील बक्षिस विजेत्यांच्या सत्कार-समारंभाचे सूत्र संचालन संपादक मंडळातील श्री.वसंत धुपकर यांनी स्वरचित विनोदी कविता वाचन करून केले. त्यास सभासदांनी पसंतीची दाद दिली. विजेत्यांपैकी पुढील उपस्थित सभासदांनी अध्यक्षांचे हस्ते बक्षिसाचा स्विकार केला. पुरुष विभाग - श्री.मोहिनीराज वैद्य (चोपडा) : तृतिय पारितोषिक रु.२००/-. सभेस येऊ न शकलेल्या स्त्री-पुरुष बक्षिस विजेत्यांची बक्षिसाची रक्कम त्यांचे घरी पाठविण्यात येईल असे श्री.धुपकर यांनी जाहीर केले.

त्यानंतर 'एन.जी.मोरे सर्व्हिस ॲवॉर्ड' प्रदान करण्याचा कार्यक्रम झाला. माननीय श्री.एकनाथजी ठाकूर यांनी असोसिएशनला दिलेल्या रु.१,११,१११/- च्या देणगीच्या व्याजाच्या रकमेतून त्यांच्या इच्छेनुसार विदर्भ विभागातील दोन सभासदांना त्यांनी केलेल्या असोसिएशनच्या उत्कृष्ट कामाबद्दल देण्यात येतो. यंदाचे हे दुसरे वर्ष. यावर्षी नागपूर येथील सभासद श्री.सी.एन.वझिरानी व श्री.एस.एल.तुंबडे यांना पुरस्काराची रक्कम (प्रत्येकी रु.५०००/-) आपले अध्यक्ष श्री.गोखले यांचे हस्ते देण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन सर्कल जॉइंट सेक्रेटरी श्री.विलास गंधे यांनी केले.

यानंतर 'कै.ल.ना.पाबळकर स्मृती सुवर्णपदक' व मानपत्र प्रदान करण्याचा कार्यक्रम झाला. यंदा हा मान असोसिएशनचे सर्कल व्हाइस प्रेसिडेंट व मुंबई झोनल सब्-सेंटरचे अध्यक्ष श्री.एस.बी.गोखले यांना, त्यांनी आतापर्यंत केलेल्या असो.च्या उत्कृष्ट कार्याबद्दल देण्यात आला. श्री.गोखले यांना सुवर्णपदक, मानपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मा.अध्यक्षांचे हस्ते त्यांचा सत्कार करून त्यांना गौरविण्यात आले. याप्रसंगी मा.अध्यक्षांचे समयोचित भाषण झाले. सत्काराला एस.बी.गोखले यांनी उत्तर देऊन सर्वांचे व विशेषत: श्री.बी.जी.दांडेकर यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री.वसंत धुपकर यांनी केले.

त्यानंतर धुळे युनिट व औरंगाबाद झोनल सब्-सेंटर तर्फे अध्यक्ष श्री.व्ही.एम.गोखले व सेक्रेटरी श्री.रा.ना.लळिंगकर यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह भेट देऊन हार्दिक सत्कार करण्यात आला. त्यानंतर ऑफिसर्स असो.चे अध्यक्ष श्री.राजा कांबळे तसेच धुळे रीजनल बिझिनेस ऑफिसचे उ.म.प्रबंधक श्री.नागेसाहेब यांची समयोचित भाषणे झाली. श्री.नागेसाहेबांनी पेन्शनर्सचे जे कांही प्रश्न असतील ते सोडविण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य मिळेल असे आश्वासन दिले. यानंतर पी.पी.जी. डिपार्टमेंट (मुंबई) चे उप-महा प्रबंधक श्री.प्रदीप ठाकरेसाहेबांचे मार्गदर्शनपर भाषण झाले व त्यांनी पेन्शनर्सचे प्रश्न त्वरित सोडवण्याचे आश्वासन दिले. त्यानंर स्टाफ युनियनचे श्री.दधिच यांचे भाषण झाले.

त्यानंतर श्री.बी.जी.दांडेकर साहेबांचे भाषण झाले. त्यात त्यांनी कै.श्री.मधुकरराव रणसिंग यांनी धुळे युनिटच्या स्थापनेपासून असो.चे काम वाढवण्यासाठी त्यांनी केलेल्या कामाचा अवर्जून उल्लेख केला. तसेच फेडरेशनच्या दिल्ली हायकोर्टातील केसेस संबंधी माहिती सांगितली व केंद्र सरकारमधील संबंधित अधिकाऱ्यांच्या आडमुठेपणाच्या भूमिकेचा उल्लेख केला.(याबद्दल सविस्तर माहिती 'संवाद' मधून दिलेली आहे) इतर

कोर्टातून दाखल केलेल्या केसेसबद्दलही त्यांनी माहिती सांगितली. शेवटी त्यांनी सर्वांनी नेत्रदान करावे असे आवाहन केले.

भोजनानंतरच्या दुसऱ्या सत्रामध्ये सेक्रेटरी श्री.लळिंगकर यांनी असोसिएशनचा वार्षिक अहवाल मंजुरीसाठी सभागृहापुढे ठेवला. आपल्या 'संवाद' मधील आवाहनानुसार सांगली येथील एक सभासद श्री.एस.डी.मेहता यांनी अहवालासंबंधी व असो.च्या आर्थिक आय-व्यय व ताळेबंद पत्रकाविषयी कांही प्रश्न व शंका उपस्थित केल्या होत्या. त्याला सविस्तर लेखी उत्तरें व खुलासे पाठविल्याचे सेक्रेटरींनी सांगितले. त्यानंतर सभेने ह्या वार्षिक अहवालास एकमताने मंजुरी दिली. यानंतर असो.चे ट्रेझरर श्री.डी.ए.कुलकर्णी यांनी सभागृहापुढे वार्षिक आय-व्यय पत्रक व ताळेबंद मंजुरीसाठी ठेवले. ते सर्वांनी एकमताने मंजूर केले. त्यानंतर मे.अे.आर.सुलाखे अँड कं. यांची पुढील वर्षासाठी असो.चे ऑडिटर म्हणून नेमणूक करण्यासंबंधीचा ठराव संमत करण्यात आला. तसे बँकेच्या कॉर्पोरेट सेंटर/हेड ऑफिस/झोनल ऑफिस व रीजनल ऑफिस स्तरावरील सर्व संबंधित अधिकारी वर्गाचे ते देत असलेल्या सहकार्याबद्दल असो.तर्फे आभार मानण्यात आले व तसा ठराव संमत करण्यात आला.

यानंतर बँकेची 'पेन्शनर्स मीट' झाली. त्यावेळी बँकेतर्फे श्री.प्रदीप ठाकरेसाहेब, उ.म.प्र.(पीपीजी), यांनी सभासदांनी उपस्थित केलेल्या पेन्शनविषयक सर्व प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली व यापुढेही सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर आभार प्रदर्शन झाल्यावर सौ.मनिषाताई पुणेकर यांनी 'पसायदान' गायल्यावर वार्षिक सभेचे समापन झाले.

**- रा.ना.लळिंगकर, सेक्रेटरी**

(Snapshots of the Annual General Meeting are given on page 5 & 6)

## *सर्वांचे माहितीसाठी - म्युच्युअल वेलफेअर स्किम*

आपल्यापैकी बरेच सभासद सर्व्हिसमध्ये असताना वरील स्किमचे सभासद झालेले आहेत. परंतु अशा लोकांना निवृत्तीनंतर त्यांना स्वत:ला व नंतर फॅमिली मेंबर्सना फायदे मिळतात याची माहिती नसते. ती आम्ही सविस्तर खाली देत आहोत.

नोकरीमध्ये असताना सभासदांनी पगारामधून त्यांच्या सोईप्रमाणे रु. २०/-, रु. ४०/-, रु. ६०/-, रु. ८०/- चे युनिटचे पैसे दरमहा भरलेले असतात.

निवृत्तीनंतर वरील फंडातून औषधासाठी/ऑपरेशनसाठी खालीलप्रमाणे बँकेची मदत मिळू शकते. याचा उपयोग सभासद व त्यांच्या पत्नीसाठी व सभासदांच्या मृत्यूनंतर त्याच्या पत्नीला मिळू शकेल.

| हॉस्पिटल खर्चाच्या ९०% रक्कम एकूण लिमिटपर्यंत(रिअेम्बर्समेंट म्हणून युनिट | ज्यादा खर्च सिरिअस रोगांसाठी हॉस्पिटलसाठी किंवा हॉस्पिटल खर्चा विरहीत एकूण लिमिट पर्यंत (रिअेम्बर्समेंट म्हणून) | आर्थिक वर्षासाठी इतर मेडिकल खर्चासाठी दरवर्षी (रिअेम्बर्समेंट म्हणून) |
|---|---|---|
| रु. २० रु. ६००० | रु. ६००० | ५०० वार्षिक |
| रु. ४० रु. १५००० | रु. १५००० | १००० वार्षिक |
| रु. ६० रु. २२५०० | रु. २२५०० | १५०० वार्षिक |
| रु. ८० रु. ३०,००० | रु. ३०,००० | २००० वार्षिक |

सिरिअस आजार -Tuberculosis, Cancer, leprosy, mental, cardiac, kidney disease or accident of a serious nature, reimbursement of medical expenses upto overall limit of Rs. 6000/- during life, whether hospitalisation is involved or not. (limit as per unit)

वरील तीन प्रकारच्या मेडिकल रिइम्बर्समेंटसाठी एकच मेडिकल फॉर्म वापरावयाचा आहे.

निवृत्तीनंतर आपण वरील स्किमचे व वरीलपैकील कोणत्या युनिटचे सभासद आहोत याची खात्री आपल्या झोनल ऑफिसमध्ये कार्मिक विभाग HR Section विभागामध्ये जाऊन समक्ष करावी.

वरील पैकी दरवर्षी मिळणाऱ्या मेडिकल क्लेमसाठी फॉर्म भरून, सोबत बिले जोडून, (मागे सही करून) व डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनसह (आवश्यक तेथे) पेन्शन शाखा अधिकाऱ्याची सही फॉर्मवर घेऊन त्याचे मार्फत किंवा शक्य असल्यास समक्ष जाऊन झोनल ऑफिस - एच.आर. सेक्शनमध्ये मध्ये द्यावी. बिलांच्या झेरॉक्स प्रती, क्लेम फॉर्मची झेरॉक्स प्रति स्वत:कडे ठेवाव्यात. (आर्थिक वर्ष एप्रिल ते मार्च अखेर) सर्दी, ताप, खोकला, डायबेटीस, ब्लड प्रेशर इ. साठी मेडिकल मदत दरवर्षी युनिटप्रमाणे सुमारे १५ वर्ष मिळेल. या व्यतिरिक्त सभासदाच्या मृत्युनंतर त्याच्या पत्नीला ज्यादा पेन्शन खालील युनिटप्रमाणे (बँकेच्या पेन्शन व्यतिरिक्त) दरमहा मिळू शकेल.

| युनिट | मिळणार पेन्शन | युनिट | मिळणार पेन्शन |
|---|---|---|---|
| २० | २०० | ६० | ३७५ |
| ४० | २५० | ८० | ५०० |

वरील पेन्शन मिळण्यासाठी शाखा अधिकाऱ्यांमार्फत त्यांची सही घेऊन, मृत्यूचा ओरिजनल दाखला अर्जासोबत जोडून तो अर्ज शक्यतो समक्ष झोनल ऑफिस एच. आर. सेक्शनमध्ये नेऊन द्यावा. अर्जामध्ये पेन्शन खाते नंबर, ब्रँचचे नाव नमूद करावे. वरील अर्जांची पोच झेरॉक्स कॉपीवर घ्यावी. वरील गोष्टीनंतर Monthly Financial Relief/पेन्शन पुढील महिन्यापासून चालू होऊ शकेल.

बँकेच्या पेन्शनप्रमाणे वरील MWS पेन्शनसाठी नोव्हेंबरमध्ये दरवर्षी वार्षिक लाईफ सर्टिफिकेट, पेन्शन शाखेच्या शाखाधिकाऱ्याची सही घेऊन द्यावे त्याचा फॉर्म झोनल ऑफिस एचआर सेक्शनमध्ये मिळेल. वरील सर्टिफिकेट न दिल्यास पेन्शन बंद होऊ शकते. वरील सर्व विषयासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास एम. एस. वाघमारे, ऑफिसर एच. आर. सेक्शन झोनल ऑफिस पुणे यांच्या फोनवर करावी. त्यांचा फोन नंबर- २६४०४३६४/३६५ असा आहे.

वरील स्कीमची सर्व माहिती न विसरता आपल्या पत्नीला व मुलांना/महत्त्वाच्या व्यक्तिंना द्यावी म्हणजे आपल्या मृत्यूनंतर त्याचा उपयोग आपल्या पत्नीला होऊ शकेल.

# 39th Annual General Meeting held at Dhule – Snapshots



Chief Guests & Office-bearers at the Venue



Chief Guests & Office-bearers on the Dais



Shri.N.K.Joshi welcoming Shri.V.M.Gokhale



Shri.S.B.Kulkarni welcoming Shri.B.G.Dandekar



Shri.S.P.Dixit welcoming Shri.Thakare, AGM (PPG)



Shri.V.M.Gokhale lighting the Lamp



Shri.Sahebrao Desai lighting the Lamp



Shri.Sahebrao Desai speaking on the occasion

# 39th Annual General Meeting held at Dhule – Snapshots



S.B.Gokhale being presented with 'Scroll of Honour'



Shri.S.B.Gokhale being presented with 'Late Shri.L.N.Pabalkar Gold Medal'



Shri.R.N.Lalingkar being felicitated on behalf of Dhule Unit



Shri.V.M.Gokhale being felicitated on behalf of Dhule Unit



Audiance at the AGM dt.27-08-2013



Audiance at the AGM dt.27-08-2013



Shri.Pradeep Thakare, AGM (PPG) addressing the "Pensioners' Meet"



Shri.V.M.Gokhale, President, addressing the members present for AGM

## In Retrospect

For getting our grievances redressed we have approached various Courts. But this is not a new thing for us. However many members may not be aware that even in the past our Association had solved the grievances by filing Writ Petitions in Bombay High Court. I give below the information in regard to two Court Cases. The present generation is not aware about the struggle and also who were the persons.

Under the guidance of Sarvashri Late L.N.Pabalkar, President of the Association, Late G.S. Aphale, Late P.T.Chaphalkar, Late T.V. Khire, Late B.L.Nisal, Late S.V.Lele and Shri. K.D. Paradkar, Court cases were filed. We are greateful to all these solders.

*********************************

### Pension Fund contribution
### Recovery / Recovery stopped / Refund

As per Presidency Banks' and Imperial Bank's Pension Fund Rules until 1931 pension fund contribution from employees (Award staff & supervisory staff) was not recovered. However, in 1931, the Central Board of the Imperial Bank of India, due to the slump in the economy, introduced a 10% cut in the emoluments of the staff. Simultaneously, I.B.I. Employees' Pension & Guarantee Fund Rules were also amended w. e. f. 1/11/1931 and recovery of 5% of salary being employees' contribution (Award staff & supervising staff) towards Pension Fund started.

After the second world war, financial position improved. Therefore, as assured, the Bank should have stopped the recovery of Pension Fund contribution from all employees. However this was not done by the Bank. Therefore Award staff employees raised this issue before Gupta Tribunal (known as Gupta Award) which was applicable to employees of only then Bengal Circle and thereafter in 1949 - 50 before Sen Tribunal. Both recommended that this contribution should be stopped and the Bank should give pension from its own funds without the help of employees' contribution. However, unfortunately, on 9th April 1951 the Sen Award, for technical reasons, was declared as void by the Supreme Court, by a majority judgment. There after the position remained unchanged, until the application of the Sastry Award, as modified, from the 1st April 1954, In fact again a demand was made by the unions before the Sastry Tribunal that 1) Recovery of Pension Fund contribution from employees should be stopped & 2) contribution already recovered should be refunded to employees. Though the demand of "refund" was not approved, the Tribunal declared that, recovery of contribution from employees' salary should be stopped. The Bank preferred an Appeal before the Labour Appellate Tribunal against the decision of the Sastry Tribunal. However, the Labour Appellate Tribunal rejected the Bank's appeal. Finally the recovery of contribution from monthly salary of employees (all categories) towards Pension Fund was stopped with effect from 1/11/1954. This decision was taken by the Central Board of Imperial Bank of India at its Meeting held on the 17th January 1955. Accordingly the decision was made applicable to all employees (Award staff & officers). Exactly that time the Government of India (GOI) had announced its decision to take over the Imperial Bank of India (IBI). Therefore GOI advised that the provisions of "Sastry Award" and "Labour Appellate Tribunal" are applicable only to Award staff and not for officers (Non - Award Staff). Hence it was advised that the recovery of 5 % towards Pension Fund from the salary of "Non - Award" staff should be resumed with effect from 1/7/1955 (i.e. the date from which S.B.I. came into being). However no recovery was done for the period 1/4/1954 to 30/6/1955 (being employees of I.B.I.).

Some individual pensioners viz. Late Shri M.M.Budharaja and others as well as the Federation of the supervising staff were time and again requesting the Bank for discontinuing the recovery of 5 % contribution w.e.f. 1/7/1955 from the salary of officers, as in the case of Award staff. Due to repeated

requests from the above, the Chairman of S.B.I. on 28/2/1967 discussed the issue with the officials of GOI and it was decided that a committee, consisting of following Members, should examine the issue and submit its report.

GOI - Shri. D.N.Ghosh Dy.Secretary (Banking)
Ministry of Finance
RBI - Shri. S.Narayanswamy
Personnel Manager
SBI - Shri. S.D.Varma
Dy.Secretary (Central Office)

The above Committee submitted its report on 2/8/1968 recommending that "the said (recovery of) contribution be abolished as from the 1st April 1968". However the Committee did not mention anything about the refund of contribution recovered from the officers' salary during 1/7/1955 and 31/3/1968.

Above Committee's recommendation was approved by the Central Board of the Bank in its meeting held on 20/9/1968. Accordingly from 1/4/1968, the recovery of 5% of salary from officers, towards "Pension Fund" was discontinued and suitable amendments were made in Pension Fund Rules and Bank's contribution to Pension Fund was increased from 5% to 10% of the salary of all employees.

(Only for information of readers, I would like to add that as on 1/1/1968 there were 51,174 employees) (44,687 Award Staff i.e. about 87% and 6,487 Supervising Staff).

## Court Case

As explained above the recovery of Pension Fund contribution from officers was stopped from 1/4/1968. Pensioners from officers cadre were of the opinion that as no contribution was recovered from Award staff from 1/4/1954, the same should not have been recovered even from officers, when both were members of the same fund (Trust). Therefore, they felt, the Bank should have taken the decision of refund of the contribution recovered from 1/7/1955 (From 1/4/1954 to 30/6/1955 no contribution was recovered from all employees, as stated above). However that time no Association of Pensioners was in existence. S.B.I. Pensioners' Association (Mumbai Circle) was established in 1974. In 1982 this Association took the decision to file a Writ Petition in the Bombay High Court.

The information about the Writ Petition,which was filed on 2/9/1982, is as under :-

Writ Petition No. 3136 of 1982 filed in the High Court of Judicature at Bombay
(under article 226 of the Constitution of India) (besides Articles 14 & 16)

The above W.P. was filed on 2nd September 1982 as per declaration signed by Shri. P.P.Erande.

Petitioners : 1) Shri. Tryambak Vishnu Khire
2) Shri. Bhalchandra Laxman Nisal.
3) Shri. Shankar Vithal Lele
4) State Bank of India Pensioners' Association, Pune,
(Through its Secretary,Shri. P.P.Erande)

**Versus**

Respondents: 1) Chairman, State Bank Of India, Central Office, Bombay,
2) The Trustees of the Imperial Bank of India Pension and Guarantee Fund
c/o State Bank of India, Central office, Bombay.
3) Union of India

Counsels : 1) Mr. Michael F. Saldhana for Petitioners

2) Mr. F.D. Damania, instructed by M/s Crawford Bayley & Co. for Respondent No.2
3) Mr. R.M.Aggarwal for Miss. S.G. Shah for Respondent No. 3

Corum : 1)Shri. Rege & Shri. Kotwal Judges

**Oral Judgment dated 19/7/1983**

Para 3 of the Judgment is as under :

"There does not appear to be any serious challenge to the claim of the petitioners. According to the learned Counsel for the State Bank of India, infact the Bank had recommended the said payment to the Union of India, respondent No.3, for its sanction. The stand taken by the Union of India is that they are not concerned with the said payment as the State Bank of India was an autonomous body. However, the Learned Counsel for the Union of India has stated that the Union of India has no objection to whatever order that this Court may pass in connection with the said refund. In that view of the matter, in our view, the petitioners would be entitled to the refund of their contribution to the said Pension Fund made by them between the period 1st July 1955 and 1st April 1968".

Further it was ordered,

Para 5 -

"It may be pointed out that various of these petitioners who would be entitled to the refund of their contribution have retired from the Bank long time ago and are at present in advanced age. The court, therefore, directs that the refund of the contribution to which they are entitled be made to them before 31st August 1983".

As per the above order, three individual petitioners received the refund before 31st August 1983.In this connection it is very interesting to note that the Writ was filed on 2/9/1982 and Judgment pronounced on 19/7/1983.

As per the direction of the Court, detailed instructions were issued by S.B.I., Central Office, Mumbai, to refund the contribution to officers vide letter No. PA/CIR/70 OF 3/10/1983. In the letter it was advised that the "refund the contribution with interest thereon".

In the "Prayer" interest on the amount was also claimed. However, in the judgment there was no mention about interest. In spite of this, the Bank paid interest @5% p.a. (the rate applicable to Pension Fund as on 30/6/1955).

As the interest rate was very low many pensioners requested the Association to demand interest @ 12% p.a. on the amount refunded to pensioners. Accordingly as suggested by the Association, Counsel discussed the issue with M/S Crawford Bayley & Co., Bank's Solicitors. However there was no response.

Hence a Writ Petition No. 2047 was filed in 1984 signed by Shri. K.D.Paradkar, the Secretary of the Association.

Shri. M.F.Saldhana, Advocate for Petitioner.

Shri. F.D.Damania & Shri. S.M.Kapadia of M/S Crawford Bayley & Co. For Respondents

Corum : Mr Jastice Dharmadhikari & Mr. Justice Sugla

Order x x x x x x

"State Bank of India should pay interest at the rate of 9% p.a. from 1st April 1968 till the date of payment of the amount (as 5% p.a. was paid by S.B.I. additional liability will be at the rate of 4% p.a. only)".

Both the writ petitions were supported by the officers' federation.

***- Shri. B.G.Dandekar***

## Establishment of a new Zonal Office in Mumbai Module

On 24th May 2013 the Bank has established a new Zonal Office in Mumbai module. The office is functioning from 6th floor of Belapur Railway Station Complex at Navi Mumbai. Shri K.S. Anbalagan is the first Dy.General Manager. There are 3 Regional Business Offices (RBOs) and some branches like Konkan Bhavan under his control. RBO-I controls branches from Mulund to Anto Hill. RBO-II controls branches located in Navi Mumbai and part of Raigad Distrct. RBO-III controls branches in Raigad Distrct.

On Sunday the 7th July 2013 RBO-II jointly with Konkan Bhavan branch had arranged a "Pensioners' Meet" at State Bank Officers Association's School at Nerul. Shri.K.S. Anbalagan was the Chief Guest. Sarvashri B.G. Dandekar and S.B.Gokhale along with other office-bearers from Mumbai Sub-Centre attended the meet. The Meet was attended by 131 pensioners. Dr. (Mrs.) Dolly Avasthy guided the pensioners about maintaining good health.

**- R.V.Chhabria,** Regional Secretary (Navi Mumbai)

*********************************************************************

**Snapshots of Pensioners' Meet held at Navi Mumbai**



**Shri K.S. Anbalagan, Dy. Gen. Manager addressing the pensioners**



**Shri S.B Gokhale speaking on the occasion**



**Pensioners attentive to Shri Gokhale's speech**



**One of the pensioners seeking clarification**

नेत्रदान व रक्तदान - श्रेष्ठदान

## युनिट वार्ता

### नाशिक युनिट :

नाशिक जिल्ह्यातील पेन्शनर्सचा मेळावा व वार्षिक सभा शुक्रवार दि. २३ ऑगस्ट २०१३ रोजी नाशिक येथील गद्रे मंगल कार्यालय येथे संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री.आर.एम.कुलकर्णी होते. सभासदांचे स्वागत झाल्यावर गतवर्षातील दिवंगत सभासदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर नवीन सभासदांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच ज्या सभासदांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केलीत त्यांचा अध्यक्षांचे हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

युनिट सेक्रेटरी श्री.राजाभाऊ पटवर्धन यांनी अहवाल वाचन केल्यावर सर्कल मॅनेजिंग कमिटी मेंबर श्री.भीमसिंग ठाकूर यांनी फेडरेशन स्तरावरील घडामोडी व कोर्ट-केसेस संबंधीची माहिती सभासदांना दिली. बँकेच्या मार्च २०१३ पासून लागू केलेल्या झोनल ऑफिसेसच्या पुनर्रचनेनुसार आता नाशिक जिल्ह्यातील सर्व ब्रँचेसचा समावेश बँकेच्या ठाणे झोनल ऑफिस परिक्षेत्रात करण्यात आल्यामुळे आपल्या असोसिएशनच्याही झोनल सब-सेंटर्सच्या रचनेत बदल करावा लागला. त्यानुसार नाशिक जिल्हा आता मुंबई झोनल सब-सेंटरच्या ठाणे विभागाला जोडण्यात आला आहे. त्यामुळे नाशिक जिल्ह्यातील सभासदांची पेन्शनसंबंधीची सर्व कामे व मेडिकल बिलांच्या मंजुरीची कामे ठाणे झोनल ऑफिसमध्ये होतील असे श्री.ठाकूर यांनी सांगितले.

त्यानंतर श्री.चंद्रकांत ठाकूर यांनी 'आर्ट ऑफ लिव्हिंग'च्या सुदर्शन क्रिया व सत्संग'' या विषयावर एक सुरेख व उद्‌बोधक कार्यक्रम सादर केला. आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री.कुलकर्णी यांनी कोर्ट केसेसच्याबाबत फेडरेशनकडून योग्य तो पाठपुरावा आगामी काळात प्रभावीपणे व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच नाशिक युनिटच्या नवीन पदाधिकाऱ्यांनी पदभार स्विकारल्यानंतर चालू ठेवलेल्या असोसिएशनच्या प्रभावी कार्याबद्दल त्यांचे कौतुक केले व सर्वांना घेऊन काम करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.रघुनाथ विसपुते यांनी आपल्या नेहमीच्या खुमासदार शैलीत करून कार्यक्रमात रंगत भरली व उपस्थितांना खूष केले. श्री.राजाभाऊ पटवर्धन यांनी आभार प्रदर्शन केले. यानंतर अल्पोपहार होऊन कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री सतीश गायकवाड, दिलीप सांगळे, प्रकाश देशमुख, दिनेश बच्छाव, भास्कर गायकवाड, भरत जैन, प्रकाश जोशी, पी.वाय.देशपांडे, सुभाष चौधरी, एस.डी.कुलकर्णी आदी कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास जिल्ह्यातून मोठ्या संख्येने सभासद हजर होते.

**- राजाभाऊ पटवर्धन, सेक्रेटरी (नाशिक युनिट)**

### Solapur Unit :

The Annual General Meeting of the Solapur Unit was held on 21st June 2013 at Amphi Theatre, Solapur under the Chairmanship of Shri.B.V.Joshi which was attended by about 180 members.

Shri.N.S.Ambuse extended a warm welcome to all the members. "Isha-Stavan' was sung by Shri.D.R.Bendre. Then Shri.M.W.Deshpande, Vice-President, read out the names of the deceased members who passed away during the last year. All the members stood in silence for two minutes to pay respect to the departed souls.

The following members who completed their 75 years of age were felicitated by offering them a bouquet and a shawl/sweets at the hands of the Chairman Shri.B.V.Joshi.
Shri.D.D.Gavhane, Shri.S.B.Mente, Shri.M.R.Kamble & Mrs.Kamble, Shri.Kamatgi & Mrs.kamatgi, Smt.Usha Kulkarni.

Other Felicitations :

1) Sou.& Shri.N.S.Ambuse who completed 50 years of their marriage were felicitated by offering them Bouquet & Shawl.

2) Shri.Subhash Javalekar was felicitated for his election as Secretary of Maha. State Blood Banks Association.

3) Shri.A.L.Angal was felicitated for his whole hearted involvement in conduct / running of Bank's Dispensary.

Then Shri.M.W.Deshpande read out the Annual Report of the Unit which coverred social and cultural activities undertaken by the Unit during the year.

Shri.D.R.Bendre, Treasurer, presented the Financial report of the Unit before the house which was approved by the house unanimously.

Shri.T.M.Patil, Secretary, apprised the house of the latest position of the Court cases filed by our Federation and other Circle Associations as also regarding SBIRE Medical Benefit Scheme & Mutual Welfare Scheme. He also narrated the

unit's achievements in respect of grant of Family pension / payment of ex-Gratia payment in deserving cases. He appreciated the help and co-operation of Mumbai/Pune HQ functioneries as also Branch functioneries of local branches in getting the sanction of these cases.

Shri.Shashikant Lawanis entertained the members by telling jokes which was appreciated and responded with chearful applause.

Shri.B.V.Joshi, in his presidential speech, appreciated the sincere efforts put-in by the office-bearers/activists of the unit, especally of Shri.T.M.Patil, Secretary, in organizing the various activities / solving members' problems etc.

Pensioners' Meet :

The AGM was followed by the "Pensioners' Meet" arranged by Shri.Shirshikar, Chief Manager (Admn) of Regional Business Office. Shri.Kulkarni, Shri.Ghaisas, C,M.(Balives Br), Shri.Rao, C.M.(Solapur Treasury Br), Shri.Shete, B.M.(Market Yard, Solpaur Br) were also present and graced the occasion.

Shri.M.W.Deshpande welcomed the dignitaries on the dais by offering them bouquet. Shri.T.M.Patil requested the members to come forward and put their problems/issues, if any, before the Bank's functioneries. Shri.Shirshikar (CM, Adm) welcomed the office-bearers of the Pensioners' Association and also all the pensioners who attended the meeting. He assured the pensioners to look into their problems/issues and initiate necessary steps to sort out the problems.

While concluding the meet Shri.L.D.Jagtap, one of the pensioners present, extended the Vote of Thanks.

The function was ended with 'Pasaydan' sung by Mrs.Sortur, Mrs.Bendre and Smt.Tamhane. At the end Snacks / Tea were served to all the members.

***- T.M.Patil,***
*Secretary (Solapur Unit)*

## Writ Petition No.1931/2002 in Delhi High Court

As you know that the final hearing of the above W.P. under the Senior Citizen's category is taking place before a single judge and our Bank has submitted the details of the pension fund at the hearing held on 25th July 2013. The further hearing was held on 22nd August 2013. Taking into consideration various aspects of the issue and the pension fund position submitted by the Bank the Dasti notices were served to the Bank to clarify certain matter. The case was posted on 10th October 2013 for further hearing. We are watching with keen interest the further developments in the case and let the members know about it in due course.

******************

## Transfer Petitions filed by our Bank in the Supreme Court

Federation has advised that the hearing of the Transfer Petitions Nos.750-758 filed by our Bank in the Supreme Court for transfer of the W.Ps/W.As pending in the Madras High Court took place on 12-08-2013 before the Registrar's Court. The service to all the Respondents (Petitioners in W.Ps) is not complete. The Respondents to whom service is complete have been granted 4 weeks time for filing their Counter Affidavits. In respect of unserved Respondents, return of notice is awaited.

**The next date of hearing is posted to 18-10-2013**

***- Secretary***

## विनोद

डॉक्टर - हे बघा तुमचा आजार जरी गंभीर असला तरी तुम्ही तुमच्या इच्छाशक्तिच्या जोरावर तुमचा निम्मा आजार पळवून लावू शकाल, काळजी सोडा व धैर्य ठेवा!

पेशंट - थँक यू डॉक्टर ! फक्त तुम्ही तुमचे बिल मात्र निम्म्याने कमी करा!

**- वसंत धुपकर,** पुणे
०२०-२०२५५४०८

## 'संवाद' लेख स्पर्धा २०१३

### पुरुष विभाग – तृतीय पारितोषिक विजेता लेख

# आजी आजोबा–अपेक्षा व उपेक्षा

''आजी, सैपाक घरात लुडबुड करू नकोस''

''आजोबा, टी.व्ही. लावू नका.''

''आजी-आजोबा, मधे मधे बोलत जाऊ नका'' असे वरील संवाद ज्या घरांमध्ये आजी व आजोबा अस्तित्वात असतात त्या त्या घरांमध्ये ऐकायला येतील. मग हे संवाद कसले प्रतिक आहेत? प्रत्येकाला आपल्याा घरात आजी व आजोबा हवेत का नकोत? त्यांच्यावर प्रेम करायला तुमच्या जवळ वेळ आहे की नाही? आजी-आजोबांकडून कोणत्या अपेक्षा कराल? आजी-आजोबांना इतरांकडून कसल्या अपेक्षा आहेत? आजी-आजोबांची उपेक्षा होतेय की नाही? ते इतरांची उपेक्षा करतात का? हा विषय अत्यंत गहन आहे. त्यात खूप प्रश्न आहेत. त्यांची उकल करणे खूप कठीण आहे तरी उकल करण्याचा प्रयत्न करणं योग्य ठरेल.

''हल्लीच्या काळात आजी-आजोबा घरात हवेत का नको?'' ह्या विषयावर चर्चासत्र निबंध लेखन स्पर्धा, प्रबोधन, विचार विनिमय इ. आयोजित केले जातात. आजी आजोबा काय निर्जीव वस्तू आहेत काय? वॉशिंग मशिन, कुकर, इस्त्री, गॅस, टेबल, खुर्ची ह्या वस्तू निर्जीव असल्यामुळे खराब, नादुरुस्त जुन्या, निरुपयोगी झाल्यामुळे एक तर कमी भावात विकता येतात किंवा फेकता येतात. नवीन फंडा म्हणजे एक्सचेंज ऑफर जुन्या वस्तू देऊन त्या बदल्यात नवीन वस्तू विकत घेता येतात. त्याचप्रमाणे आपल्या घराघरातले आजी-आजोबा म्हातारपणामुळे, व्यवस्थित काम करू शकत नसल्यामुळे, थकले असल्यामुळे त्याचा उपयोग होत नसल्यामुळे त्यांनाही घरातून बाहेर काढले जाते. त्याही पलिकडे वृद्धाश्रमात त्यांना पाठवले जाते. केवढा हा दैव दुर्विलास! वृद्धांचे भाग्य थोर की एक्सचेंज ऑफर निघाल्या नाहीत नाहीतर वृद्धांना देऊन त्या बदल्यात तरुण.....

आजी-आजोबा ह्या नुसत्या शब्दाने प्रत्येकाच्या मनात आदर, प्रेम, माया, ममता, जिव्हाळा, ह्याच भावना उचंबळून यायला हव्यात. त्यांनी केलेल्या कष्टांची, मार्गदर्शनाची, केलेल्या त्यागाची, त्यांच्या लाघवी बोलण्याची, गोड गोड वागण्याची, त्यांनी केलेल्या कार्याची, कामांची, पार पाडलेल्या कतृत्वाची तसेच वेळोवेळी सर्वांना दिलेल्या मौलिक मार्गदर्शनाची आठवण, स्मृती सतत यायला हवी पण तसं होत नाही.

ह्याला कारण म्हणजे आजी-आजोबा ह्यांच्याकडून तीन पिढ्यांना वेगवेगळ्या अपेक्षा असतात. त्याच प्रमाणे आजी-आजोबांना ह्या तीन पिढ्यांकडून निरनिराळ्या अपेक्षा असतात.

आजी-आजोबांकडून त्यांच्या मुलांच्या, त्यांच्या मुलींच्या, सुनांच्या व जावयांच्या म्हणजेच पुढील पिढीकडून अपेक्षा, इच्छा, आकांक्षा असतात.

दुसऱ्या ह्याच आजी-आजोबांकडून त्यांच्या आई-वडलांच्या भाऊ बहिणींच्या म्हणजेच त्यांच्या मागल्या पिढीकडून वेगळ्या अपेक्षा असतात.

तिसरा गट म्हणजेच ह्याच आजी आजोबांकडून त्यांच्या नातवंडांच्या म्हणजे अधिक पुढल्या पिढीच्या अपेक्षा असतात.

चवथा गट म्हणजेच आजी-आजोबांच्या मागच्या पिढीकडून, पुढील पिढीकडून व तिसऱ्या पिढीकडून काही अपेक्षा असतात.

म्हणजेच आजी-आजोबांकडून तीन पिढ्या अपेक्षा करतात तर आजी-आजोबा तीन पिढ्यांकडून काही अपेक्षा करतात. ह्या सर्वांचा मतितार्थ हाच की सर्वजण अपेक्षांचे ओझे बाळगत असतो. प्रत्येक पिढीच्या अपेक्षांचे स्वरूप, त्यांची तीव्रता भिन्न भिन्न असते.

कशा असतात ह्या अपेक्षा? पुढीलप्रमाणे - आई-वडीलांना वाटते की माझ्या मुलाने व सुनेने त्यांचेच ऐकावे, योग्य मान ठेवावा.

प्रत्येक मुलाला वाटते की, आई वडिलांनी फक्त माझे व माझ्या पत्नीचेच ऐकावे.

प्रत्येक नातवंडांचे सुद्धा हेच म्हणणे असते की आजी आजोबांनी फक्त आमचेच ऐकावे व आमचेच लाड करावेत.

तेव्हा हा प्रपंच तीन पिढ्यांच्या अपेक्षांचा आहे, हा संघर्ष ह्या तीन पिढ्यांच्या अपेक्षांचा आहे. ह्या तीन पिढ्या युगायुगांपासून आपल्या दिसत असतात. हा संघर्ष, ह्या अपेक्षांचे स्वरूप त्यातून मार्ग काढणारे, त्यांची वाटचाल ह्या विषयी अतिशय सुरेख चित्रीकरण, विवेचन व निवेदन आदरणीय कै. राजकपूर साहेबांनी कल, आज और कल ह्या चित्रपटाद्वारे खूपच रास्त, योग्य स्वरूपात मांडले आहे.

काय-काय अपेक्षा असतात?

१) आजी-आजोबा ह्यांनी गुपचूप पडून राहावे. टी.व्ही. कमी पाहावा. शक्य तोवर उपदेश, सल्ला देऊ नये.

२) त्यांनी कुठलीही आर्थिक उलाढाल करू नये. त्या विषयी सल्ला देऊ नये, कुठलाही निर्णय घेऊ नये.

३) नातवंडांना गोष्टी सांगाव्यात, सांभाळ करावा. कारण आईवडील दोघेही नोकरी करतात.

४) आजी-आजोबांनी कोणाला शिकवू नये, नातवंडांशी बोलू नये, त्यांनी कसा संसार केला ह्या बढाया मारू नयेत.

५) सहसा नम्रपणे हळू आवाजात बोलावे. जर काही प्रश्न असतील तर मुलांसमोर बोलू नये. कारण लहान मुलं चांगले श्रोते नसतील पण चांगले निरीक्षक असतात.

६) योग्य मार्गाने चर्चा करून संकटांवर मात करावी.

७) योग्य मार्गाने चर्चा करून संकटांवर मात करावी.

८) कुटुंबातल्या सर्व लोकांकडून तुमच्या अपेक्षा काय आहेत हे स्पष्टपणे सांगावे.

९) आजी-आजोबांची स्तुती करा, त्यांच्याकडून खूप अपेक्षा करू नका. त्यांच्यावर टीका, वाईट मत देऊ नका. त्यांच्यावर विश्वास दाखवा म्हणजे प्रेमापेक्षा जास्त आवडेल.

९) तुम्ही बाहेर असाल तर आजी-आजोबांवर जबाबदारी टाका. त्यांना 'काउंट' करा.

१०) आजी-आजोबांच्या अनुभवाचा उपयोग करून घ्या.

११) नियमित 'फॅमिली' मिटिंग्ज घ्या. निदान एकवेळचे जेवण तरी सर्वांनी बरोबर घ्या.

१२) आज तुम्ही आजी-आजोबांशी जसे वागाल तसेच तुमची मुलंही तुमच्याशी वागतील ह्याची जाणीव प्रत्येकाने ठेवावी.

आजी-आजोबांनीही खालील गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

१) तुम्ही पेरेंटस् नाही आहात. तुम्ही मधे मधे लुडबुड करू नये. शिस्त व अभ्यासात डोकावू नका. शक्यतो कोणाची बाजू घेऊ नका.

२) लहान मुलांसमोर त्यांच्या आईवडीलांना रागावू नका. शक्यतो 'तुझ्या जागी मी असतो तर' हे वाक्य टाळायल हवे. कारण जनरेशन गॅप व काळ बदललेला आहे.

३) तुम्ही 'पिलर्स' आहात तेव्हा सपोर्ट करा. अडचण बनू नका. नातवंडांसमोर आपल्या मुलांचे कौतुक करा. शाबासकी द्या.

४) नातवंडांशी चर्चा करा, प्रेमाने बोला. मधून मधून विनोदी वातावरण ठेवा.

५) तुमच्या आजारपणाची सर्वांना कल्पना देत राहा.

या नवीन युगात खूप मुलंमुली परदेशात नोकरी निमित्त जातात. तिथे मेड/सर्व्हंट खूप महाग असतात व अशा वेळी फक्त आजी-आजोबांची आठवण येते. कारण मुलीच्या व सुनेच्या 'डिलीव्हरी'साठी, बाळाच्या संगोपनासाठी ह्यांना परदेशात न्यावे लागते. त्यातही बऱ्याच वेळा आजी-आजोबांची ताटातूट करावी लागते. हे कटू, विदारक सत्य आहे. ह्या अपेक्षांनी आजी-आजोबा भरडले जातात. दु:खी होतात व पिचतात.

हा सर्व अपेक्षांचा खेळ आहे. आजी-आजोबा अपेक्षा कधीही पूर्ण होत नाहीत व त्यांच्या नशिबी फक्त उपेक्षाच पदरी पडते.

किती कुटुंबात आजी-आजोबांची योग्य मानमर्यादा पाळली जाते? त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जाते? त्यांच्या जेवणा खाण्याच्या वेळा व्यवस्थित पाळल्या जातात? त्यांच्या आहाराची काळजी घेतली जाते? त्यांच्या अपेक्षांची, भावनांची, प्रेमाची, मायेची काळजी किती व कोण कोण करताना दिसते?

ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे नकारात्मक येतील. ह्याचा अर्थ त्यांच्या नशिबी फक्त उपेक्षाच पदरी पडेल. हे कटू सत्य आहे.

अर्थात खूप निराश होण्यासारखी परिस्थिती वाटतेय पण काळाप्रमाणे ह्यात फरक जाणवतोय. अलिकडल्या काळात नातवंडानाच आजी-आजोबा हवेहवेसे वाटतात. तसेच ते त्यांना आवडू लागले आहेत. त्यामुळे परिस्थिती बदलत जातेय. कुटुंब व्यवस्था बदलू लागली आहे. लोकांना, बऱ्याच कुटुंबांना एकत्र कुटुंब व्यवस्था आवडू लागली आहे.

प्रत्येक व्यक्तीने एकच विचार केला की, मी सुद्धा केव्हा तरी आजी-आजोबा होणार आहे तेव्हा ह्याच अपेक्षा माझ्याकडूनही अपेक्षित असतील व ह्याच उपेक्षा मलाही सहन कराव्या लागतील. त्यापेक्षा मी आताच माझ्यात योग्य तो बदल, योग्य त्या सुधारणा का करू नयेत? हा विचार जर केला तर परिस्थिती 'पॉझिटिव्ह' होईल व सर्व जण सुखी होतील.

'अपेक्षा व उपेक्षा' ह्यांची सांगड कुटुंबातील प्रत्येकाने योग्य रीतीने घातली तर सर्व आजी-आजोबा सुखी होतील.

जाता जाता एक अनुभव सांगतो. मी ३१ जुलै २०१२ रोजी सेवानिवृत्त झालो. माझी आई ९० वर्षांची आहे. सकाळी तिला नमस्कार केला व सांगितले की, मी आज रिटायर होतो आहे. ती पटकन म्हणाली, ''काय सांगतोस? इतक्या लवकर तू कसा रिटायर होत आहेस?'' तेव्हा मला प्रथम जाणवले की, माझ्या आईला मी साठ वर्षांचा झालो यावर विश्वास नाही किंवा आपला मुलगा खरोखर इतका मोठा झाला? साठ वर्ष संपलीत. प्रत्येक आईला अजूनही वाटते की, मुलगा अजून लहानच आहे.

ही माझ्या आधीच्या पिढीची माझ्या पिढीकडून असलेली अपेक्षा.

ह्याचाच अर्थ असा की, अपेक्षा व उपेक्षा ह्यांचा नेहमी योग्य बॅलन्स करून सर्व आजी-आजोबा सुखी होवोत हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

**- मोहनीराज गजानन वैद्य,** चोपडा
भ्रमणध्वनी - ९५८८४०४१६२

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession Register No. PNCW/M-144/2011-2013 Dated 10.12.2010
Permission to Post without Prepayment No.: WPP-217 at Market Yard P.S.O. on 25th of each Month

## एक चित्र

आवळीच्या प्रत्येक फांदीच्या शेवटी
ओठांना गुलाबी लिपस्टिक लावलेलं
बिट्टीच्या प्रत्येक हिरव्या अंबाड्यात
पिवळं जर्द फूल खोवलेलं
गुलमोहर सरलायं मग काय झालं?
मी आहे नं' म्हणत , म्हणत
लालजर्द एक्झोरा फुललेला मजेत
फुले संपली म्हणून रुसलेला शिरीष
कुंपणावरची बोगनवेल गारठलेली पावसात
डुलतलेली चुकार फुलं अधेमधेच
पाठशिवणी चालू खारींची मनमुराद
आवाजासह च्युक्, च्युक्, चटरपटर
सरडा डोकावतोय एखादा हळूच
जांभळं सारी टपटपवून सुस्तावलेली जांभळं
फांद्यातून डोकावणारे दोनच बुलबुल
लाल रंग मिरवीत शेपटीत, दोनच बुलबुल

**- कल्पना सुभाष कोठारे**
दूरध्वनी - २६१०४५५२

## श्रावण धारा

आषाढीत का तू रुसला
अन् बळीराजा हिरमुसला
असा कसा तू लहरी
बरस ना सरीवर सरी ॥१॥
वनराई ओरपली कोणी?
माणसा तुझीच ही करणी
जाहली रुष्ट मग धरणी
करू नको अशी मनमानी ॥२॥
वागशील आतातरी नीट
टाळण्या दुष्काळ अरिष्ट
कसे फेडशील हे पाप
सृष्टीचा नको हा शाप ॥३॥
तू जरी कितीही चुकला
नच वरुणदेव कोपला
श्रावणात मुक्त बरसला
माणसा-असशील समजला ॥४॥
श्रावण सरींचे लेणे
सुचले पाऊस गाणे

**- प्रभाकर कानिटकर,**
कोल्हापूर

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.